आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राज्यात रेल्वे विकासाचे दीड लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरु असल्याचं रेल्वे मंत्र्यांचं लोकसभेत निवेदन

- लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राष्ट्राच्या सुरक्षेच्या मुद्द्याचा वापर राजकारणासाठी करत असल्याचा संसदीय कामकाज मंत्र्यांचा आरोप

- राष्ट्रीय गीत वंदे मातरमची सर्व सहा कडवी वाजवण्याचे केंद्र सरकारचे दिशानिर्देश जारी

- मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदाचा पदभार रितू तावडे यांनी तर उपमहापौरपादचा कार्यभार संजय घाडी यांनी स्वीकारला

**आणि**

- १२वीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी उघड, २३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**<><><><><>**

राज्यात एक लाख ५० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिली. अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या काळात, वंदे भारत गाड्यांची वाढती संख्या पाहता त्यांची तांत्रिक देखभाल आणि विश्वसनीयतेसाठी विशेष पायाभूत सुविधांची आवश्यकता असल्याकडे लक्ष वेधलं. वंदे भारत साठी अहिल्यानगरमध्ये मेन्टेनन्स अर्थात देखभाल डेपो उभारण्यासंदर्भात त्यांनी प्रश्न विचारला, तसंच या गाड्यांमध्ये स्थानिक खाद्यपदार्थ समाविष्ट करण्यासंदर्भात आणि या खानपान आणि व्यवस्थापनात महाराष्ट्रातले स्थानिक बचत गट आणि तरुणांना रोजगार देण्यासंदर्भात सरकार धोरण तयार करेल का, यासंदर्भात लंके यांनी प्रश्न विचारले. यावर उत्तर देताना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी, राज्यातल्या रेल्वेसाठी केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

राज्यातल्या रेल्वेप्रकल्पांसाठी साठी अर्थसंकल्पात २३ हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असं ते म्हणाले.....

**होल्ड बाईट वैष्णव**

**दरम्यान,** लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षांनी लोकसभेच्या महासचिवांना सादर केला होता. या ठऱावात काही त्रुटी आढळल्यामुळे तो फेटाळला जाऊ नये म्हणून त्यात दुरुस्ती करावी अशी सूचना ओम बिर्ला यांनी सचिवालयाला केली. त्यानंतर त्यात दुरूस्ती करून ठराव पुन्हा सादर करण्यात आला.

काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्षासह विविध पक्षांच्या ११८ सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे. या अविश्वास दर्शक ठरावावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत लोकसभेच्या कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांनी घेतला आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे अर्थसंकल्पावरची चर्चा पुढे सुरु झाली.

केंद्रीय अर्थसंकल्पात कोणत्याही ठोस उपाययोजना  केल्या नाहीत, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. सध्या जगभरात संघर्ष सुरू आहे, मात्र या संघर्षाचा सामना करण्यासाठी आवश्यक तरतुदी  या अर्थसंकल्पात नाहीत असा आरोप करत डिजिटल व्यापार नियमनावरचं केंद्र सरकारचं नियंत्रण सुटल्याची टीका त्यांनी केली. या अर्थसंकल्पात कृत्रिम बुद्धिमत्तेवर भर देण्यात आला आहे, मात्र एआयमुळे अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातले अनेक रोजगार कमी होणार आहेत याकडे गांधी यांनी लक्ष वेधलं.

राज्यसभेतही आज अर्थसंकल्पावरील चर्चा पुढे सुरू झाली. मुस्लिम लिगचे खासदार हरीस बीरन यांनी या चर्चेत सहभाग घेतला.   राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजाची सुरुवात शून्य प्रहराने झाली. विविध पक्षाच्या सदस्यांनी अनेक महत्त्वाचे मुद्दे सभागृहात उपस्थित केले.

**<><><><><>**

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्याचा वापर राजकारणासाठी करत असल्याची टीका संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली आहे. ते संसद भवन परिसरात वार्ताहरांशी बोलत होते. राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा हा अतिशय महत्त्वाचा असून राजकीय फायद्यासाठी त्याचा वापर करू नये असं आवाहन त्यांनी गांधी यांना केलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारने राष्ट्रीय गीत वंदे मातरम संदर्भात आज नवे दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार सरकारी कार्यक्रमांमधे, शाळांमधे, तसंच इतर महत्त्वाच्या कार्याक्रमांमधे जन गण

मन या राष्ट्रगीतानंतर लगेचच  वंदे मातरम् वाजवणे अनिवार्य असेल. वंदे मातरम गीताची सर्व सहा कडवी वाजवली जातील. यापूर्वी वंदेमातरमची दोनच कडवी प्रचलित होती, आता मात्र हे गीत संपूर्ण वाजवलं जाईल असं या दिशानिर्देशांमधे म्हटलं आहे.  राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांच्या आगमन-प्रस्थानाच्या वेळी, त्यांच्या भाषणापूर्वी आणि नंतर तसंच राष्ट्रध्वजारोहणाच्या वेळी  हा नियम लागू राहील.  गृह मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलंय की हे गीत वाजवले किंवा गायलं जात असताना उपस्थितांनी सावधान मुद्रेत उभे राहावं.
चित्रपटगृहातल्या मध्यंतराचा मात्र या नियमात समावेश नाही.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका रितू तावडे यांनी आज मुंबईच्या महापौर म्हणून कार्यभार स्वीकारला. शिवसेनेचे संजय घाडी यांनी  उपमहापौर पदाचा कार्यभार स्वीकारला. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत रितू तावडे आणि संजय घाडी यांची  बिनविरोध निवड झाल्याची औपचारिक घोषणा झाली. यावेळी मुखमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच दोन्ही पक्षाचे मान्यवर उपस्थित होते. मुंबईच्या विकसाकरता नवनिर्वाचित महापौर आणि उपमहापौरांना राज्यशासनाचा पाठिंबा राहील असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

अजित  पवार यांच्या अपघाताची चौकशी सुरू असून याचं सत्य बाहेर येईल, मात्र या घटनेचा राजकारणासाठी वापर होऊ नये याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र  फडणवीस यांनी केलं आहे. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. भारतीय तपास यंत्रणेवर अविश्वसास व्यक्त  करणं चुकीचं असल्याचंही ते म्हणाले.  आपण केंद्र सरकारला पत्र पाठवलं आहे, अपघातग्रस्त विमानाचे ब्लॅक बॉक्स मिळाले आहेत, त्यामुळे तपास पूर्ण व्हायची वाट पाहावी असं ते म्हणाले.

**<><><><><>**

थोर विचारवंत आणि जनसंघाचे संस्थापक सदस्य पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची आज पुण्यतिथी. त्यानिमित्तानं उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला  यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

पंडित दीनदयाळ यांना राज्यातही विविध ठिकाणी आयोजित कार्यक्रमात आदरांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पंडित दीनदयाळ यांना समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली.

<><><><>

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या कन्नड तालुक्यात जैतापूर इथं इयत्ता बारावीच्या बोर्ड परीक्षेत इंग्रजी विषयाच्या पेपरदरम्यान सामूहिक कॉपीप्रकरण उघडकीस आलं आहे. याप्रकरणी निरीक्षकांसह २३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. परीक्षार्थी एकमेकांच्या उत्तरपत्रिकांमधून उतरवत असल्याचे निदर्शनास आलं असून  सीसीटीव्ही फुटेजमधेही हे दिसून आल्याचं पोलिसांनी सांगितलं. या प्रकारात सहभागी असलेल्या शाळेतल्या कर्मचाऱ्यांविरोधातही  कारवाई केली जाईल, असं शिक्षण विभागानं म्हटलं आहे.

<><><><>

महसूल गुप्तचर संचालनालयाने दक्षिण मुंबईत झवेरी बाजार परिसरात तस्करी झालेलं सोनं वितळवण्याच्या ठिकाणावर छापे टाकले आणि  ९ कोटी २२ लाख रुपये किमतीचं ५ किलो ८०० ग्रॅम सोनं जप्त केलं. या प्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली आहे.

<><><><>

बीड जिल्ह्यात परळी इथल्या औष्णिक वीज केंद्रातल्या ६ आणि ८ क्रमांकाचे युनिट तत्काळ बंद करण्याचे निर्देश केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं  दिले आहेत. या संदर्भातलं पत्र राज्याच्या नियंत्रण मंडळाला पाठवलं असल्याची माहिती सूत्रांनी  दिली. मंडळानं नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या गटानं या दोन्ही युनिटमध्ये उत्सर्जन आणि कचरा व्यवस्थापनात अनेक नियमांचं उल्लंघन होत असल्याचा अहवाल सादर केला होता.

<><><><>

आयसीसी टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या सामन्यात बरोबरी झाल्यानं सुपर ओव्हर सुरू आहे. अमदाबादमध्ये सुरू असलेल्या या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.  दक्षिण आफ्रिकेने ६ गडी गमावून १८७ धावां केल्या. अफगाणिस्तानचा संघही १०

षटकात १८७ धावांवर सर्वबाद झाला. त्यामुळं सुपर ओव्हर खेळवली गेली. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये दोन्ही संघाच्या समान धावा झाल्या. सध्या दुसरी सुपर ओव्हर सुरू आहे.

ग्रुप ‘बी’ मधे ऑस्ट्रेलियाचा सामना आज आयर्लंडबरोबर श्रीलंकेत कोलंबो इथं थोड्याच वेळापूर्वी सुरू झाला. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर संध्याकाळी ७ वाजता ग्रुप ‘सी’ मधे इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज हा सामना रंगणार आहे.

**<><><><><>**

राज्यात आज झालेल्या दोन वेगवेगळ्या रस्ते अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर सात जण जखमी झाले. मंगळवेढा-पंढरपूर पालखी मार्गावर एसटी बस आणि पिकअप टेम्पो यांच्यात झालेल्या अपघातात टेम्पो चालकाचा जागीच मृत्यू झाला तर बसमधल्या सहा शाळकरी विद्यार्थ्यांसह बसचा चालक किरकोळ जखमी झाला.

**वाशीम** जिल्ह्यातल्या रिसोड मेहकर मार्गावर सरपखेडा फाट्याजवळ टँकर आणि दुचाकीच्या अपघातामध्ये एका कृषी मंडळ अधिकाऱ्याचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाल्याची घटना आज सकाळी घडली.

**//<><><><><>//**